Serial Number

↓

0002872

Roll No. .....

Total No. of Questions : **20**

Total No. of Printed Pages : **7+1** Blank

P-909

High School, Examination (Regular) - 2020

मराठी (सामान्य)

MARATHI (General)

Time : **3** Hours] [Maximum Marks : **100**

निर्देश : सर्व प्रश्न सोडवा.

1 रिकाम्या जागा भरा : **5**

(1) पेताची हरिश्चन्द्रास्थानाची मूळ प्रति मी _____ म्हणून जपली आहे.

(2) टिळकांनी _____ व्रत घेतले.

(3) _____ दिवशी बैलाना गाडीला जुंपत नाही.

(4) डॉ. आंबेडकर हे विद्वान _____ होते.

(5) इन्द्रायणीच्या साठी _____ समाश्री आहे.

(रिकाम्या जागेत शब्द निवडून लिहा)

(देशसेवेचे, विद्वान, विजय स्मारक, ज्ञानेश्वरानी, पोळयाच्या)

2 सत्य / असत्य लिहा : 5

(1) मंडालेच्या तुरुगांत टिळकांना ठेवले होते.

(2) तात्या देव आहांत तुम्ही.

(3) शनी हा ग्रह सर्वात लहान आहे.

(4) देशाच्या ''हित संबधातची जोपासना'' हे देशरक्षणाचे पहिले तत्व.

(5) मांडवगड हा काश्मिरातील इतिहास प्रसिद्ध किला आहे.

3 जोड्या जमवा : 5

(1) माझे विजय स्मारक	–	ग. दि. माडगूळकर
(2) मृग	–	ला. रा. पांगारकर
(3) हिवाळा	–	वि. दा. सावरकर
(4) लोकमान्य टिळक	–	अनिल
(5) जन्मठेपेची शेवटची रात्र	–	आपटे गुरुजी

4 एका वाक्यात उत्तरे लिहा. 5

(1) नामदेव कोणत्या गोष्टींना दुर्भिळ म्हणतात ?

(2) वैद्यराजांकडे जाऊं नये असे अण्णा पांगारकरांना कां म्हणाले ?

(3) धागू कोण होता ?

(4) वृक्ष कुलाचे व्रत कोणते ?

(5) मातीच्या सुगंधाचा खोंडावर कोणता परिणाम झाला ?

5 वाक् प्रचारांचा अर्थ सांगा – 5

(1) हात देणे

(2) कपाळाला हात लावणे

(3) विक्रम करणे

(4) नंदनवन होणे

(5) श्री गणेशा करणे

6 विरुद्धार्थी शब्द लिहा : 4

(1) प्रसिद्ध

(2) अपमान

(3) मोठा

(4) शिष्य

7 समानार्थी एक शब्द लिहा – 4

(1) आकाश

(2) ढग

(3) सकाळ

(4) हवा

8 शब्द समूहाबद्दल एक शब्द सांगा. 4

(1) मन ताब्यात ढेवण्याचा गुण

(2) ज्याचे मूल्य करतां येत नाही

(3) नम्रपणे वागणार

(4) पुढे जाणार

9 खालील प्रश्नांची उत्तरे लिहा – 4

घुघरी गावांत व इतर गावांत काय फरक आहे ?

किंवा

वृक्ष कुलाचे व्रत कोणते ?

10 आंबेडकराना आंबेडकर हे आडनाव कसे मिळाले ? 4

किंवा

टिळकांचा नारा कोणता होता ?

11 पोपट कां झुरतो, त्यावरून कवीला काय सुचवायचे आहे ? 4

किंवा

गांधीजीनी जनतेला कशाचे आवाहन केले ?

12 संदर्भसह गद्याचा अर्थ लिहा – 6

''त्या प्रेमाच्या भाजी भाकरीची काही अवीट गोडी होती''

किंवा

रामाप्रमाणे 14 वर्षे वनवास भोगलात धन्य आहे.

0002872 0002872 0002872 0002872

13 संदर्भसह पद्याचा अर्थ लिहा 6

तदा बापाचे हृदय कसे होते
न ये वदता अनुभवी जाणती ते ।

किंवा

स्नान झाली धरणीचे पडे सोन्याचा प्रकाश
आता बसेल माऊली अन्नब्रम्हाच्या पूजेस ।

14 साहित्य लेखक परिचय लिहा. 4

वि.दा. सावरकर

किंवा

ला.रा. पांगारकर

15 साहित्य कवी परिचय लिहा. 4

ग.दि. माडगूळकर

किंवा

अनिल (आ.रा. देशपांडे)

16 खालीलपैकी प्रश्नाची उत्तरे लिहा. 5

वैद्य राजांच्या स्वभावाचे वर्णन करा.

किंवा

नागा लोक भारताच्या कोणत्या भागांत राहतात ? त्यांची प्रसिद्धी कशा बदल आहे ?

0002872 0002872 0002872 0002872

17 प्रश्नाची उत्तरे लिहा – 5

एकनाथानी श्रीकृष्णाच्या मोठे पणाचे वर्णन कसे केले आहे ?

किंवा

कविच्या मनाला कोणकोणत्या गोष्टींची ओढ लागली आहे ? व कां ?

18 पारितोषिक मिळवलेल्या बदल मित्राला अभिनंदन पत्र लिहा. 6

किंवा

विज्ञान प्रदर्शनीमधे येण्यासाठी आमंत्रण करा.

19 उतारा वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा 5

''आपण झाडामाडात देव पाहतो. दगडधोंड्यात देव पाहतो परंतु मानवातील देव आपण्यास दिसत नाही – आपणांस चार तोंडाचा, आठ हातांचा असा देव पाहिजे असतो, जो मनुष्याहून निराळा असून आपल्याला फायदेशीर असो. हे खरे आहे मनुष्याच्या सपाने आपल्या शेजारी उभा असलेला परमेश्वर आपणास दिसत नाही. या मुळे आपण भांडतो, ईश्वराला सुद्धा गुलाम करण्यायी माणसात इच्छा असते. देवाची पूजा करतो त्यातही स्वार्थ असते. ह्या करीता माणसानी स्वतः मधे देव पाहा हा चालता फिरता देव आहे. ह्या साठी माणसाला चरित्रवान, सत्य बोलणारा व योग्य निर्णय घेणारा बनावं लागेल. तेव्हा तुमची भक्ति व पूजा योग्य ठरेल.

(1) आपण कशात देव पाहतो ?

(2) आपणास कोणता देव दिसत नाही ?

(3) माणूस देवा बद्दल कसा स्वार्थी आहे ?

(4) माणूस देव होण्या साठी माणूस कसा हवा ?

(5) उताऱ्याला योग्य शीर्षक लिहा.

20 खालीलपैकी एका विषयावर 250 ते 300 शब्दाचां निबंध लिहा. **10**

(1) पावसा आता तरी ये.....

(2) देश हा देव असे माझा

(3) विज्ञानाचे महत्व

(4) एका महापुरुषाचे जीवन चरित्र

(5) प्रदूषण – एक महान संकट

BLANK PAGE

00028872 00028872 00028872 00028872